# University of Mumbai

**No. Elg. /484/ of 2019.**

परिपत्रक

प्राचार्य/संचालक/प्रमुख सर्व संलग्नित महाविद्यालये/ मान्यताप्राप्त संस्था/विभाग यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष_२०१९-२० मध्ये प्रथम वर्ष पदव्युत्तर (PG) अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेऊ इच्छिणा-या सर्व विद्यार्थ्यांनी (मुंबई विद्यापीठ व मुंबई विद्यापीठाव्यतिरीक्त इतर विद्यार्थी) Digital University या प्रणालीमार्फत Online Application प्रक्रिया करावी.

ज्याप्रमाणे प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमांचे Online Application हे Digital University या प्रणालीमार्फत राबविण्यात येते त्याचपध्दतीने विद्यार्थ्यांनी प्रथम वर्ष पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी Online Application करावयाचे आहे. तद्नंतर सदर महाविद्यालयांनी Digital University या प्रणालीतून College Login मधून विद्यार्थ्यांचे Online Application submit/Confirm करून आपल्या महाविद्यालयांमध्ये प्रथम वर्ष पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेऊ इच्छिणा-या सर्व विद्यार्थ्यांची माहिती विद्यापीठास Online पध्दतीने submit करावयाची आहे.

ज्या विद्यार्थ्यांकडे पदवी अभ्यासक्रमांचा १६ अंकी PRN (16 Digit Permanent Registration Number) असेल त्या विद्यार्थ्यांना तोच PRN वापरून प्रथम वर्ष पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी Online Application करता येणार आहे. जे विद्यार्थी इतर महाविद्यालयातून आपल्या महाविद्यालयात प्रथम वर्ष पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छितात अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश Digital University प्रणालीमार्फत निश्चित करण्यासाठी सदर विद्यार्थ्यांनी पुर्वीच्या महाविद्यालयातून Digital University या प्रणालीमधील Online Transfer Certificate प्राप्त करून आपल्या महाविद्यालयात सादर करणे बंधनकारक आहे.

तसेच जे विद्यार्थी मुंबई विद्यापीठात नव्याने प्रवेश घेऊ इच्छितात किंवा ज्या विद्यार्थ्यांकडे मुंबई विद्यापीठाचा १६ अंकी PRN (16 Digit Permanent Registration Number) नसेल अशा विद्यार्थ्यांनी Digital University प्रणालीमार्फत आपली सर्व माहिती भरून प्रथम वर्ष पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी Online Application करावयाचे आहे.

सदर प्रक्रियेचे सविस्तर Presentation DU Portal वर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

दिनांक : २५ जुन, २०१९